Maharashtra Mandal
mmla
Los Angeles

# भरारी

महाराष्ट्र मंडळ लॉस एंजेल्स वृत्त    जानेवारी २०१४




## प्रिय वाचकहो,

सप्रेम नमस्कार!!! सर्वांना नव्या वर्षाच्या शुभेच्छा देऊन हे नव्या  वर्षाच पाहिलं वहिलं "महाराष्ट्र मंडळ वृत्त" आपणासमोर  सादर करत आहोत. ह्या वृत्तातर्फे मंडळात झालेल्या, चाललेल्या आणि होणाऱ्या  कार्यक्रमांचा अहवाल दर दोन महिन्यांनीआपल्यासमोर ठेवण्याचा मानस आहे.  आपल्या करमणुकीसाठी ह्या वृत्तात एखादा लेख आणि कविता घालण्याची सुद्धा इच्छा आहे.  आणि हो ! आपले अध्यक्ष सुद्धा आपल्याबरोबर मंडळाचे उपक्रम आणि त्यांची प्रगती ह्या वृत्तामार्फत कळवणार आहेत.

सप्टेंबर मध्ये आपण धुमधडाक्यात गणपती पार पाडले तसेच नोव्हेंबर मध्ये दिवाळी साजरी केली. गणपतीला सन फ्रान्सिस्कोच्या कलाकारांनी आपल्या समोर २ नाटके आणि दिवाळीला आपल्या स्थानिक कलाकारांनी मोठ्या उत्साहाने आपल्या समोर नृत्य संध्या सादर केली. म्हणता म्हणता २०१३ संपले देखील. आता येतोय आपल्या नव्या वर्षातील पहिला सण, संक्रांत. तिळगुळाची देवाणघेवाण आणि एकमेकांशी गोड गोड बोलण्याचं आश्वासन देवून ह्या वर्षाला सुरुवात करायची आहे. २०१४ च्या ह्या वर्षात पदार्पण करताना आपली बालगोपाल मंडळी आपलं मनोरंजन करणार आहेत.



वालेन्सिया येथे ५ जानेवारी २०१४ रोजी श्रीमती शैलाताई माटे आणि श्रीमती वन्दनाताई घाटे ह्यांच्या हस्ते मराठी शाळेचे भव्य उद्घाटन झाले. ही शाळा सुरु करण्यात महाराष्ट्र  मंडळाच्या प्रतिनिधी  श्रीमती सई सावंत यांचा सिंव्हाचा वाटा आहे. वालेन्सियाच्या पालकांचे सहकार्य आणि मुलांची उमेद वाखाणण्यासारखी होती. तसेच श्री. दांडेकर आणि श्री. गायकी यांच्या मार्गदर्शनाखाली उभ्या राहिलेल्या वालेन्सिया शाळेत सध्या २० मुले आहेत. उद्घाटन प्रसंगी श्री. पानट यांनी शाळेची पहिली घंटी वाजवली आणि सामुहिक रित्या सरस्वतीदेवीच्या स्तवनाने

शाळेला सुरुवात झाली. श्री. प्रदीप व श्रीमती माधुरी रानडे यांनी मुलांसाठी शाळेला बाराखडी लिहिलेला फळा तसेच प्रत्येक मुलाला पेन्सिलींचा डबा प्रेमपूर्वक भेट दिला. वंदेमातरम ह्या समुह गीताने ह्या कार्यक्रमाची सांगता झाली. ह्या आपल्या नव्या उपक्रमासाठी आपल्या सर्वांच्या सदिच्छा आमच्या पाठी असू द्याव्या. पुढील दोन महिन्यात एखादा मराठी चित्रपट दाखवण्यासाठी आणि आनंद मेळा करण्यासाठी मंडळ प्रयत्नशील आहे.

<u>भरारी संपादिका: प्रज्ञा कुवाडेकर</u>

## अध्यक्षांच्या दृष्टीकोनातून ध्येये आणि प्रगती:

२०१४ मधला नवीन उपक्रम म्हणजे वालेन्सिया येथील मराठी शाळा. महाराष्ट्र मंडळाने त्यांचे प्रतिनिधी, स्थानिक पालक व स्वयंसेवक ह्यांच्या सहाय्याने हि शाळा उभारण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. ह्या संक्रांतीला नव्या शाळेतील बालगोपाल मंडळी सुद्धा आपल्या करमणूकिंच्या कार्यक्रमात उत्साहाने भाग घेणार आहेत. तसेच, मुलांना आपल्या मायबोलीत बोलण्यासाठी उत्तेजन मिळावे व त्यांचा आत्मविश्वास वाढवा ह्यासाठी वत्कृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येतील.
२०१४ मध्ये मराठी शाळेच्या मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी मंडळाच्या सर्व कार्यक्रमाची सुरवात शाळेच्या मुलांच्या समुहगीताने होईल. या वर्षी संक्रांत कार्यक्रमाचे निवेदन लहान मुले करणार आहेत. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात पण लहान मुलांचा सहभाग आहे. नवीन वर्षाच्या सुरवातीला महाराष्ट्र मंडळाची नवीन 'वेब साइट' सुरु केली आहे. मंडळाची सर्व कागद-पत्र संग्रह करण्यासाठी नवीन फाइल depot सुरु केला आहे. या वेब साइटच्या मदतीने आम्ही सर्व मराठी लोकांचा डेटाबेस बनवण्याचा प्रयत्न करणार आहोत. हा भरारी चा पहिला अंक. भरारी स्थानिक साहित्याकाराना प्रोत्साहन देईल अशी अपेक्षा आहे. भरारीच्या माध्यमातून २०१४ ची कमिटी आपल्या सर्वांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत आहे. २०१४ मध्ये महाराष्ट्र मंडळाला पुढच्या स्तरावर नेण्याचा कमिटीचा एक प्रामाणिक प्रयन्त असेल. यात तुमची साथ मिळेल अशी अपेक्षा आहे.

<u>अध्यक्ष: सचिन सोनटक्के</u>

# वांग्याची भाजी आणि वैवाहिक जीवन

तीन संवाद

१) लग्नानंतरचे सुरवातीचे दिवस:

तो: ए, आज भाजी कुठली केलीयेस ग?

ती: भरली वांगी....

तो: वा! क्या बात है, अगदी मस्त बेत!

ती: अरे, तुझ्या दादा वहिनींना बोलव ना जेवायला. त्यानाही भरली वांगी आवडतात.

तो: अग, पण तुला कशाला त्रास, आणि पुन्हा आपल्या दोघांच्यात लुडबुड! माझी माणसं झाली म्हणून काय झालं....

ती: इश्श. त्यात कसला त्रास दोन माणसांचा?... आणि ते काही फार वेळ थांबणार नाहीत!.....

तो: मी काही मदत करू का?

ती: नको! त्यापेक्षा एक नवीन आणलेली CD लाव आणि ऐकत बस. मलाही ऐकता येईल काम करताना.

तो: (CD लावून ऐकताना) अग, आज संध्याकाळी बाहेर जाउन तुझ्या साड्यांची आणि कपड्यांची खरेदी करूया का?

ती: ते बघू रे! आज संध्याकाळी फुटबॉल game आहे तुझ्या आवडीचा. आपण दोघे मिळून बघू. मी पण थोडी बियर घेईन तुझ्याबरोबर.

तो: पण तुला ते कानातलं करायला टाकायच आहे ते केंव्हा करूया ?

ती: त्याची काही घाई नाही, उलट या weekend ला तूच नवीन कपडे घे, लग्नात तू फारच कमी खरेदी केली आहेस स्वतः साठी..........

अहाहा! काय रमणीय संवाद!

२) थोडे दिवस उलटून जातात आणि......... तोच विषय परत, पण संवाद बघा:

तो: आज कोणती भाजी आहे?

ती: भरली वांगी.

तो: आज परत?

ती: हो.

तो: ती माझी आवड आहे, भाजी आणणं ही नाही.

ती: मग मला काय आनंद होतो भाजी साठी खेप करायला?

तो: मला वाद घालायचा नाही.

ती: मग मला काय हौस आहे वादाची?

तो: आणि......आज दादा वहिनी येणार आहेत जेवायच्या वेळेला , लक्षात आहे ना?

ती: हॉटेलात घेऊन जा त्यांना.

तो: का, दोन माणसांनी असा काय फरक पडतो?

ती: तुमचं काय जातं, चपात्या लाटायला लागा म्हणजे समजेल.

तो: ते माझे भाऊ वहिनी आहेत.

ती: मग तूच करना सैपाक सगळा, मी नाहीतरी बाहेर जाणारच होते.

तो: बाहेर?

ती: हो, खरेदीला, मला एक पंजाबी ड्रेस घ्यायचाय.

तो: आत्ता परवाच तर....

ती: त्याला किती दिवस झाले ते तुला कस आठवणार? तुला माझी काळजी नाही तर मलाच घेतली पाहिजे.

तो: काळजी घ्यायची म्हणजे नक्की काय करायचं?

ती: आता बघ, माझ्या मंगळसूत्रात भर घालायला हवी आहे हे किती दिवस सांगतेय. पण या कानातून आत आणि त्या कानातून बाहेर. जर तुझ्या आईनं सांगितलं असत तर लगेच धावून काम केलं असतस.

तो: माझ्या आईला मध्ये आणू नकोस.

ती: का नको? त्या आहेतच चोंबड्या. माझ्या संसारात .....

तो: (आवाज चढवून) काय म्हणालीस?

ती: काही नाही...

तो: काय बघा माहेरचे संस्कार आहेत....

ती: काय म्हणालास?

तो: काही नाही.....

<u>३) तिसरा संवाद. आता दोघांची वय झालेली आहेत.</u>

ती: काय रे, जेवायला काय करू? भरली वांगी करू?

तो: कर, पण घरात विकतच्या पोळ्या असतील तरच. पोळ्या कराव्या लागल्या तर तुझ्या बोटांचा संधिवात वाढेल. .....नाहीतर, नुसती मुगाची खिचडी कर झालं.

ती: काल दादा वहिनी यायचं म्हणत होते....

तो: मी केलाय त्यांना फोन, आणि सांगितलं येउ नका..... तब्बेतींच कारण सांगितलं....

ती: अरे, कशाला.....मी केला असता तेवढा सैपाक...

तो: नको करूस दगदग. आधीच तुझी कंबर दुखतेय. मी जातो बाहेर जरा वेळानं आणि तुझी औषधं घेऊन येतो.

ती: तुझं BP पण चेक करून घे. काल जरासा चाललास तर केवढा दम लागला तुला....

तो: आता एवढा दम हा लागायचाच. तूच विश्रांती घे, आणि CD लावून गाणी ऐकत बस जरा वेळ.

ती: तू पण बाहेर जाउ नकोस. ... मी चहा करते, नि आपण दोघे बसून गाणी ऐकू.......

तो: उत्तम! .... श्रीहरी,... श्रीहरी ....

<u>लेखक: दत्तप्रभाकर गोखले</u>

**कविता:**

विचार करता आज भरून येताहेत डोळे
मनमोकळे हसून लोटली वाटताहेत युगे
पावलापावलाला  मागे वळून बघितले
पण त्याच्या आयुष्यातून मात्र दूर निघून गेले
आता जीवन दुख्खाने भरून गेलंय
ऊरात दुख्खाचे डोंगर लपवत लपवत
मनाचे नाजूक बंध तुटताहेत
वाटतं इतकं कोणी आठवू नये...
( आज सोचा तो आंसू भर आए ... ह्या हिंदी गाण्यावर आधारित )

कवियत्री: माधवी गोवंडे

---

सदस्यांचा आढावा: २०१३ साली महाराष्ट्र मंडळात २५० सदस्य होते आणि ९९ मुले होती. ह्या वर्षी हा आकडा ५०० पर्यंत नेण्याचा आमचा प्रयत्न आहे.

सचिव: संजय कुलकर्णी

महाराष्ट्र मंडळ स्वयंसेवकांसाठी लिंक: https://mmla.wildapricot.org/volunteers

बृहन महाराष्ट्र मंडळ स्वयंसेवकांसाठी लिंक: http://bmm2015.org/volunteers

महाराष्ट्र मंडळ सदस्यांसाठी लिंक: https://mmla.wildapricot.org/membership

Website: www.mmla.org

Twitter: MaharashtraMandal LA @mmla_tweet

Facebook:http://www.facebook.com/**maharashtra.mandal**